6. Rounding up the Bank's Meet with its Pensioners, Shri Anthony Azavedo, District Secretary (North Goa) who compered the proceedings, conveyed gratitude and thanks to Shri Suyash Asthana, for extending all assistance to the Pensioners as also attending to the grievances addressed to him. He also thanked the RBOs, Zonal Office functionaries and Branch functionaries for their co-operation and assistance. He thanked Shri Amarendra Khade, Director, Panaji SBILD and his team for making available the venue for our AGM. As a gesture of love and affection, Shri Suyash Asthana, and his wife personally distributed to each pensioners, Cadbury chocolates and a beautiful sleek writing pen as a small gift.

7. The minutes of the last AGM held on 8th April 2018 were read out by Shri Dias, Secretary and confirmed by the members. He then read out the Annual Report of the ZSC for 2018-2019. Briefly stated, total 156 (pensioners and associates) were made our members. He submitted to the audience the other details such as subscription, donations and Guest house receipts etc. All the Committee Members took efforts in mobilising the members and the funds. In his Report, the Secretary also touched upon the following activities:

a) Holding of a CMC Meeting of the SBIPA, Mumbai Circle on 18th November 2018.

b) Follow up for arrears payment to deceased pensioners, legal heir/'s.

e) Submission of Life certificates by our Members.

8. In his address, Shri Vilas Gandhe, General Secretary, gave a very useful information about the Association ever since its establishment in 1974 with just 21 members in Pune during 1970-74, that for over 60 years no revision was done in Pension. It was a big struggle to come to the present level of status, a big battle indeed. He also pointed out the latest position of some other court cases and also enlightened in detail about the position of Court case No.1875 of 2013, filed by our Federation and pending in Delhi High Court.

The DGM also got the opportunity to hear from Shri Gandhe how the Association came into being and the various activities being undertaken by the Association.

Shri Gandhe also touched upon the following matters:

a) Introduction of the Medical Assistance Scheme for Family Pensioners by SBIPA Mumbai Circle recently. b) Extension of legal and financial assistance to SBI Retirees by the Bank in CBI/other legal cases in case they are called by the CBI/Court. c) Staff Welfare activities – assistance by the Bank for critical illness up to Rs.5 Lacs. d) RBI instructions regarding Customer Service for Senior Citizens. e) RBI instructions on Customer protection – limiting liability of customers in case of unauthorized electronic transactions. f) Letter to the Bank for improving commutation factor. g) Extension of nomination facility for Life Time Arrears.

9. In the open forum, some queries raised by the members were answered satisfactorily by Shri Gandhe and other Office Bearers.

10. Shri Anthony Azavedo, compered the proceedings effectively. He then proposed vote of thanks. He thanked all the following Managing Committee Members of Panaji ZSC, who worked hard to make the event very successful.

Sarvashri Mohan Parvatkar, Innacio C. H. Viegas, I. H. Dias, P. M. Mashelkar, K. V. Gopinathan, N. H. Prabhudesai, Smt. Jennifer G. Fernandes etc. He specially thanked the pensioners attending the AGM.

After singing 'National Anthem', the AGM was concluded and was followed by fellowship lunch.

**Isac Hilario Dias, Secretary, Panaji, ZSC.**

## निवेदन : सभासदांना आवाहन

**आपल्या 'संवाद'साठी स्वलिखित (मूळ प्रतच) कथा, लेख (शब्दमर्यादा १००० ते १२००), कविता, विनोद इ. साहित्य ऑर्डिनरी पोस्टानेच पाठवावे. लेख, कविता (अप्रकाशित) ४ ते ५ कडव्यांची मर्यादित असावी. साहित्य कागदाच्या एका बाजूस समास सोडून लिहावे.**

**सोबत आपला पूर्ण पत्ता पिनकोडसह असावा.**

– संपादक मंडळ, 'संवाद'

## झोपेचे औषध

**पेशंट** - **''डॉक्टर, काल संध्याकाळी तुम्ही लिहून दिलेले झोपेसाठीचे औषध कोणत्याच मेडीकल स्टोअर्स मध्ये मिळाले नाही.''**

**डॉक्टर** - **''अरे असं कसं होईल! बघू ते प्रिस्क्रिप्रशन - (बघून) अरे मी तर यावर औषध लिहायचेच विसरलो, अन् फक्त माझी सही केली आहे.''**

**पेशंट** - **''काय तुम्ही पण डॉक्टरसाहेब!''**

**डॉक्टर** - **''सॉरी! मग तुम्ही काय केले?''**

**पेशंट** - **''काय करणार! एक क्वार्टर आणून संपविली आणि ढाराढूर झोपलो.''**

वसंत धुपकर

# Family Floater Group Health Insurance Scheme

**How to generate Soft Copy of Medical Cards**

Download Benefit Plus App available at Google Play (Play Store) & Apple Store

Google Play

Click on the above APP ( Play Store / Google Play )


Type Benefit Plus in search tab, following App will appear and then click on it and download.

**Benefit Plus**

On completing download, Click on Open tab, following screen will open




Click on the above Screen, You will be taken to the following Log in Screen




To download your Soft copy of **Medical Card, for Policy A & Policy B for 2019 -20**, Username & Password will be same for the respective type of policy i. e. –


- **Policy A** – Username – SA(PF Index No.), PW – SA(PF Index No.)
- **Ploicy B** – Username – SB(PF Index No.), PW – SB(PF Index No.);

  e. g. If PFI No is 1337351

- Username - SA1337351, PW – SA1337351 for **Policy A.**
- Username - SB1337351, PW – SB1337351 for **Policy B.**

On successful login, you will be taken to the following Screen where six different options are available. Click the desired option to view the resu






You can generate card for any member of the Scheme if you know his PF Index No. For this, first log out from earlier log in and re-log in with a new PF Index No. With this you can help your other colleagues.

**Compiled by - Shri. Rajkumar Chhabria, Secretary, Navi Mumbai,**
**Shri. Balkrishna T. Tulsankar, Secretary, Raigad Dist.**

**Latest list of Representatives of MDIndia, TPA appointed at SBI AOs - For REMBS Policy A ( 01-06-2019 to 31-05-2020 ) with IFFCO TOKIO**

| SBI Administrative Office | Name of Representative | Mobile No. |
|---|---|---|
| **South Mumbai A O - I, Nariman Point** | Harish Kadam | 7391059561 |
| **East Mumbai A O - II, Belapur** | Ravi Chorane | 7391059775 |
| **West Mumbai A O - III, Worli** | Ajay Mungurwade | 7391054096 |
| **Thane A O - IV, Wagle Estate, Thane** | Prajakta Sangle | 7391059606 |
| **AO, Panaji** | Mandar Parab | 9168618891 |
| **AO, Pune - I, Pune** | Shashikant Pawar | 9168618897 |
| **AO, Pune - II** | Kalpesh | 9168618898 |
| **AO, Aurangabad - I** | Anand Pradhan | 7276714147 |
| **AO, Aurangabad - II** | Anand Pradhan | 7276714147 |
| **AO, Nagpur - I, Nagpur** | Ashwini Chawatkar | 7391830022 |
| **AO, Nagpur - II, Amravati ( at Nagpur AO - I)** | Achal Kumar Gaikwad | 7391830022<br>7709795318 |
| **AO, Nashik** | Sarang Nashikkar | 7030949735 |
| **MDIndia Health Insurance TPA Pvt. Ltd., Corporate Office, Pune Manager, Customer Care** | **9325612924** | **# Vinod Deore, Dy** |
| **MDIndia Health Insurance TPA Pvt. Ltd., Corporate Office, Pune vdeore@mdindia.com** | | **# e-mail -** |
| **MDIndia Health Insurance TPA Pvt. Ltd., Corporate Office, Pune 18002335690** | | **Toll Free** |
| **Anand Rathi Insurance Brokers Ltd., Mumbai 18001238733** | | **Toll Free** |
| **Anand Rathi Insurance Brokers Ltd., Mumbai * e-mail - sbigmchelpdesk@rathi.com** | | |

**** You may use this mail to make corrections in personal details on the insurance card, if you notice any discrepancy, duly supported with certification from the CM (HR) of your Administrative Office.***

**Compiled by - Balkrishna T. Tulsankar, Secretary (Raigad)**

# एक सुखद अनुभव

आयुष्याच्या संध्याकाळी जुन्या सुखद आठवणींना उजाळा देत बसलो आणि त्यातून प्रकर्षाने उजळणारी ही आठवण! साधारण तीस वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. मी प्रभादेवीला मुंबई झोनल ऑफिसमध्ये होतो.

बँकेच्या नियमानुसार त्यावेळी दर तीन महिन्याला Structured Meeting घ्यायची पद्धत होती ते काम माझ्याकडे असे. मुंबईच्या उपनगरातील कांदिवली इंडस्ट्रीयल इस्टेट या शाखेत Structured Meeting घ्यायचे ठरले होते योगायोगाने एका इंडस्ट्रियल युनिटच्या इन्स्पेक्शनच्या निमित्ताने त्यावेळचे चीफ रिजनल मॅनेजर सुद्धा तिथे येणार होते. त्याकाळी मुंबई झोनल ऑफिसचे C.R.M. म्हणजे मोठं शक्तिशाली प्रस्थ! नेहमीच्या पद्धतीने मी सकाळी ८.३० च्या सुमारास रिजनल मॅनेजरच्या (R.M.) घरून त्यांच्या सोबत कारने शाखेत जाणार होतो. कांदीवली इंडस्ट्रीयल इस्टेट शाखेत मी चाळीस वर्षांपूर्वी काम केले होते त्यामुळे त्या शाखेत जाण्याचा मार्ग नवख्या ड्रायव्हरला दाखवण्याची जबाबदारी माझ्यावर होती आणि माझ्या मार्गदर्शनानुसार त्याचं ड्रायव्हिंग सुरू होतं. C.R.M. बरोबरची मिटींग ठीक दहा वाजता होती. सर्व अगदी व्यवस्थित सुरू होते. कार कांदिवली भागात शिरल्यावर एके ठिकाणी मी कारला वळण घ्यायला लावले. साधारण दहा मिनीटांनी माझ्या लक्षात आले की वळणाचा मार्ग घ्यायला नको होता. मी वेळीच सावरून कार मागे घ्यायला लावली आणि योग्य दिशेने निघालो. R.M. नी विचारलं ''काय झालं रे लोपीस''? मी म्हटलं ''साहेब रस्ता चुकला'' त्यांनी म्हटलं अरे तुझी ब्रँच नां? मी अर्थातच गप्प राहिलो. एव्हांना गाडी योग्य दिशेला लागली होती. पण त्या गोंधळात अर्धा तास निघून गेला होता. दहाच्या मिटिंगला साहेब दहा वीसला पोहचले होते. मुख्य म्हणजे वरिष्ठांच्या वरिष्ठांना वीस मिनीटे ताटकळत ठेवल्याचा अपराध R.M. नी नव्हे तर प्रत्यक्षात मी केला होता. वक्तशीरपणाबाबत C.R.M. पक्के होते. शाखेत शिरल्यावर काय ताट वाढून ठेवलं असेल या नुसत्या कल्पनेने मी मानसिक तणावाखाली होतो कारण हा उशीर सर्वस्वी माझ्यामुळे होता व आपल्या साहेबांना आपल्यामुळे चार शब्द ऐकावे लागतील ह्याचे दुःख होते.

शाखेत पाय टाकल्याबरोबर C.R.M. आमच्या साहेबांना म्हणाले, ''क्यों साब, क्या टाईम हुआ? मै यहाँ कभीसे राह देख रहा हूँ. अभी यह मत बताईएँ की ट्रॅफीक जाम था! साहेबांनी हसतच उत्तर दिलं, ''सॉरी सर, थोडा प्रॉब्लेम हुआ!'' मी सर्दच झालो! मी केलेला प्रॉब्लेम हा थोडक्यात मिटविला गेला.

युनीटचं इन्स्पेक्शन तासाभरांत आटोपले. C.R.M. निघून गेले. नंतर आमची Structured Meeting सुद्धा झाली. सहा शाखांचे प्रतिनिधी आले होते. दुपारच्या सत्रांत आणखी चार शाखा झाल्या.

संपूर्ण दिवसात R.M. नी एका चकार शब्दाने सकाळच्या प्रसंगाचा उल्लेख केला नाही. हाताखालच्या ऑफिसरमुळे त्यांना वरिष्ठांचं बोलणं ऐकावे लागले, ह्याचा त्यांच्या चेहऱ्यावर मागमूसही दिसला नाही. वागण्यातला आपलेपणा तसूभरही कमी झाला नाही. नेहमीच्या खेळीमेळीत दिवस पार पडला आणि नेमक्या ह्याच गोष्टीचा मला दिवसभर कमालीचा त्रास झाला. संध्याकाळी कारमधून उतरताना मला राहवेच ना आणि मी शेवटी साहेबांना ह्याविषयी विचारले, शांत उत्तर आले ''अरे चूक झाली खरी तुझी, काय फरक पडतो? माझ्या वरिष्ठांचा राग मी केव्हांही दूर करीन'' माझ्या इतक्या मोठ्या चुकीची इतकी छोटी प्रतिक्रिया?

म्हणजे माझ्या चुकीबद्दल ते स्वतः अपराधी होऊन वरिष्ठांसमोर हजर झाले. हे मला थक्क करणारे होते कारण सध्याच्या काळांत आपली चूक कनिष्ठांच्या माथी मारण्याची वृत्ती दिसून येते. The world would have been still finer, had there been many more like him.

काही माणसं जीवनात इतरांना फक्त आनंदाचे क्षण देतात ह्या माझ्या साहेबांनी मला व इतरांना असे खूप आनंदाचे क्षण दिले आहेत. त्यामुळे आयुष्याला वेळोवेळी नवी उमेद व उभारी मिळाली. दिशा सुद्धा मिळाली. या मोठ्या मनाच्या साहेबांचे नाव आहे श्री. वि. मो. गोखले. स्टेट बँकेत असताना खूप वरिष्ठ भेटले. खूप चांगला अनुभव देणारे ! पण

हाताच्या बोटावर मोजताना जी कांही मला आठवतात व ज्यांच्यात मला माणूस प्रकर्षाने दिसला त्यात श्री. विनायक मोरेश्वर गोखले यांचे नाव खूपच वरचे आहे. मुंबई मुख्य शाखेचे D.G.M. म्हणून ते निवृत्त झाले.

मानवी मनाची इतकी उंची उभ्या सर्वीसमध्ये मला क्वचितच अनुभवायला मिळाली अन् ती सुद्धां वरिष्ठांकडून! तो भास नव्हता, ती सत्य घटना होती हे खरंच वाटत नाही. मनाचा मोठेपणा ऐकलेला आहे, वाचलेला आहे, क्वचित पाहिलेला सुद्धां असेल पण आपल्या आयुष्यांतही आपण हा दैवी अनुभव घेतलाय ही आठवणच शरीर मोहरून टाकते. श्री. गोखले साहेबांना सन २०१८-१९ सालचे सुवर्णपदक देण्यात येत आहे त्याबद्दल त्यांचे अभिनंदन. त्यांना भावी आयुष्यात निरामय आयुरारोग्य लाभो हीच सदीच्छा.

श्री. पी.ए. लोपीस, वसई

## युनिट वार्ता : अमरावती झोनल सब सेंटर वृत्तांत

श्री. अरुण इंगळे, सचिव अमरावती झो.स.सें. यांनी रविवार दि. ०२/०६/१९ रोजी अमरावती येथे संपन्न झालेल्या वार्षिक सभेचा वृत्तांत कळविला आहे.

अमरावती झोनल सबसेंटर च्या ६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षस्थानी श्री. कमलकिशोर टावरी, निवृत्त महाव्यवस्थापक होते तर श्री. ओमप्रकाश शिवप्रिय, क्षेत्रिय प्रबंधक प्रमुख पाहुणे होते. सुरुवातीला सभेने गेल्या वर्षात निधन पावलेल्या सभासदांना श्रद्धांजली अर्पण केली.

श्री. अरुण इंगळे, सचिव यांनी मागील सभेचा वृत्तांत वाचून दाखवला व अहवाल सादर केला. श्री. विनायक जळीत, सहसचिव यांनी, (श्री. सुहास देशपांडे, कोषाध्यक्ष यांचे अनुपस्थितीत) २०१८-१९ या वर्षाचा आर्थिक ताळेबंद सादर केला. दोन्हीस सभेने मंजूरी दिली. तद्नंतर सौ. रेखा अविनाश निमदेव यांच्या विशेष सहकार्याने, वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या १६ उपस्थितांचा सत्कार करण्यात आला. सत्कारार्थीपैकी श्री. रमेशचंद्र कावळे रु. ५००१/- श्री. रामकृष्ण पुंडेकर रु. ५०००/-, श्री. सुभाष देशमुख रु. ५१००/- आणि श्रीमती कुमुद आचार्य रु. १०००/- यांनी असोसिएशनला देणग्या दिल्या. त्याबद्दल त्यांचे आभार मानण्यांत आले. योगायोगाने त्याच दिवशी श्री. ल.वा.वाणी यांचा जन्मदिन होता म्हणून त्यांचाही सत्कार केला. श्री. रविंद्र पाटील व श्री. आशिष इंगळे यांचे पदोन्नती झाल्याबद्दल अभिनंदन करण्यांत आले. तद्नंतर अध्यक्ष श्री. ज्ञानप्रकाश खोब्रागडे यांनी प्रलंबित कोर्ट केसेसची व इतर महत्त्वची माहिती सभेला दिली.

अमरावती शाखेत ३१ मे रोजी एक दुर्घटना घडली. सुरक्षारक्षक श्री. महल्ले यांच्या बंदुकीतून अनवधानाने एक गोळी सुटली व जवळच उभ्या असलेल्या श्री. उज्वल देशमुख (अस्थायी संदेशवाहक) यांना जखमी करुन गेली. त्यांना प्रथमोपचारानंतर त्वरित नागपूर येथील इस्पितळात पुढील उपचारांसाठी नेण्यांत आले. या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त करुन श्री. देशमुख यांची प्रकृती लवकर पूर्ववत व्हावी अशी प्रार्थना करण्यांत आली. यवतमाळ युनिटचे श्री. गोपाळ गाडगे यांना 'कै. श्री. वासुदेवराव गंधे व श्रीमती उमाबाई गंधे स्मृती पुरस्कार' जाहीर झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यांत आले.

श्री. मोहिंदर सहानी, अध्यक्ष, नागपूर झोनल सबसेंटर व श्री. सुधीर आग्रेकर, सचिव यांनी नागपूर येथे कार्यालयासाठी स्वतःच्या जागेची आवश्यकता विषद केली. त्यासाठी देणगी स्वरुपांत सहयोग राशी देण्याचे आवाहन सभासदांना केले. त्यांना श्री. शेंडे व श्री. पोपट यांनी सहकार्य केले.

प्रमुख पाहुणे श्री. शिवप्रिय यांनी अमरावतीमधील वास्तव्याच्या स्मृतींना उजाळा देत पेन्शनर्सच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले. सभाध्यक्ष श्री. टावरी यांनीसुद्धा अमरावती शाखेत स.म.प्र. म्हणून काम केले असल्याने त्यावेळपासून आपुलकी जाणवते असे सांगितले. तसेच सर्व सहकारी आयुष्याचा उत्तरार्ध आनंदाने व्यतित करत असल्याचे पाहून समाधान व्यक्त केले व शुभेच्छा दिल्या.

भोजनोत्तर सत्रामधे श्री. पी.टी. राजा यांनी यवतमाळ येथे अद्याप दवाखाना सुरु होत नाही यास्तव तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. श्री. खोब्रागडे यांनी त्या दिशेने प्रयत्न चालू असून त्याला अग्रक्रम आहे असे विदित केले. बुलढाण्याचे श्री. मुनोत यांनीसुद्धा बुलढाण्याला दवाखाना सुरु करण्याविषयी कांहीच हालचाल का होत नाही असा प्रश्न उपस्थित केला. श्री. खोब्रागडे यांनी बँकेत सांप्रत कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या युनियनने यासंबंधी पुढाकार घ्यावा, त्यास आपण पाठिंबा देऊ असे सांगितले.

टी.पी.ए. चे प्रतिनिधी श्री. पाठारे यांनी मेडिक्लेम विषयीची माहिती विषद केली तसेच क्लेम पाठवतांना आवश्यक ती कागदपत्रे जोडून काळजीपूर्वक बिल पाठवावे असे आवाहन केले. REMBS योजनेमधील बिलाबाबत येणाऱ्या अडचणीसंबंधी सविस्तर चर्चा केली. श्री. केशव वैद्य, श्री. पी.टी. राजा यांनी क्लेम बाबत विलंब व अन्य तक्रारींवर पाठारेंशी चर्चा करुन निराकरण करण्याच्या सूचना केल्या.

सभेचे उत्तम आयोजन केल्याबद्दल श्री. बानोकर, श्री. शंकर जाऊरकर, श्री. संतोष सराफ तसेच अल्प सूचनेनंतर उत्कृष्ट सूत्रसंचालन करणारे श्री. शिरीष झंवर व इतरांच्या आभार प्रदर्शनानंतर सभा संपन्न झाली.

सचिव, अमरावती, झो.स.सें.

## अभिनंदनीय : श्री. बाळासाहेब पंढरपूरकर, अमरावती

भारतीय स्टेट बँकेने दिनांक ०१/१०/२०१४ या दिवशी आणि या तारखेनंतर विशिष्ट ४ श्रेण्यांतर्गत उघडलेल्या सर्व स्टाफ हाऊसिंग लोन खात्यांवरील बँकेला कर्मचाऱ्यांकडून देय असलेली (आउटस्टँडिंग लोन) रक्कम एस. बी. आय. लाईफच्या ग्रुप टर्म इन्शुरन्स पॉलिसीने कव्हर केली होती. ह्या पॉलिसी अंतर्गत उपरोक्त तारखेला किंवा त्यानंतरच्या कोणत्याही तारखेला उघडलेल्या इंडिविज्युअल स्टाफ हाऊसिंग लोन मधील बँकेला घेणे असलेली रक्कम, या पॉलिसी अंतर्गत लाईफ कव्हर असलेल्या एखाद्या कर्मचाऱ्याचा दुर्दैवाने मृत्यु झाल्यास एस. बी. लाईफ कडून वसूल होईल आणि त्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबावर, त्याच्या मृत्युनंतर कर्ज परतीचा कुठलाही भार पडणार नाही. ह्या पॉलिसीचं प्रिमीयम स्टेट बँकच भरणार होती. खरोखर स्टेट बँकेची ही योजना अतिशयस्पृहणीय होती. मात्र असं करताना बँकेने निहित तारखेच्या आधी ज्या कर्मचाऱ्यांनी गृह कर्ज घेतली होती आणि निहीत तारखेला आणि त्यानंतरही ज्यांचे कर्ज शिल्लक होते त्या कर्मचाऱ्यांचा दुर्दैवाने विचार केला नव्हता.

बँकेचे एक धडाडीचे सेवानिवृत्त अधिकारी श्री. राजेंद्र उर्फ बाळासाहेब पंढरपूरकर यांनी मे २०१६ मध्ये यासंबंधात एक पत्र लिहून ते पत्र अमरावती येथील स्टेट बँक पेन्शनर्स असोसिएशन यांच्याकडे देऊन त्या पत्राच्या प्रति त्यांनी पुणे येथील पेन्शनर्स असोसिएशन आणि बँकेतील युनियन/असोसिएशनच्या संबंधित पदाधिकाऱ्यांकडे रवाना केल्या आणि त्यात त्यांनी वरील बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली. मुंबई सर्कल पेन्शनर्स असोसिएशनने हे पत्र लगेच स्टेट बँकेच्या मुंबई प्रधान कार्यालयास पाठवले होते. सुरुवातीला बँकेने ही विनंती धडकावून लावली असल्याचं त्यांना कळलं होतं. तरीही हिंमत न हारता त्यांनी या बाबीचा सातत्याने पाठपुरावा बँकेकडे युनियन/असोसिएशन मार्फत केला. सर्व असोसिएशन्स/युनियन्सनी ही बाब लावून धरली व त्या संघर्षाला अखेरीस यश प्राप्त झालं. स्टेट बँकेच्या व्यवस्थापनाने या रास्त मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून सर्व कर्मचाऱ्यांच्या गृहकर्ज खात्यांना, त्यांच्या कर्ज मंजूर करण्याच्या तारखेबाबतचा आग्रह सोडून देऊन एस. बी. आय. लाईफचे विमाकवच उपलब्ध करून दिले. यासाठी एस.बी.आय. लाईफ या संस्थेला वाढीव रक्कम कव्हर करण्यासाठी स्टेट बँकेने अतिरिक्त आर्थिक भार सोसायची तयारी दाखविली आणि तसे परिपत्रक (परिपत्रक क्र. CDO/P & HRD - IR/25/2019-20) दि. ०३/०७/२०१९ ला जारी केले.

श्री. बाळासाहेब यांनी हाती घेतलेल्या या कार्याचा फायदा बँकेतील सर्वच कर्मचाऱ्यांना आणि विशेषतः बँकेच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना झाला आहे. त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत. श्री. पंढरपूरकर यांनी हे यश मिळविण्यात त्यांना साह्य करणाऱ्या श्री. निमदेव, श्री. मनोहर आष्टीकर, श्री. दिपक पिंजरकर, क्षेत्रीय कार्यालय, नागपूर आणि श्री. अविनाश कोल्हटकर मुंबई यांचे विशेष आभार मानले आहेत. कारण त्यांनी या मागणीचा बँकेकडे सातत्याने पाठपुरावा केला. भारतीय स्टेट बँकेच्या व्यवस्थापनाचेही या निमित्ताने आपण साऱ्यांनी आभार मानायलाच हवेत.

प्रकाश एकनाथ भागवत, पुणे
फो. नं. : ८६०००१६१२०

# संवाद लेख स्पर्धा २०१९

(स्त्री विभाग)

प्रथम पारितोषिक विजेता लेख

## समृद्ध जीवन

'जगी सर्व सुखी असा कोण आहे,
विचारे मना तूची शोधोनी पाहे।'

वरील पंक्ती ह्या बहुश्रुत आहेत. पूज्य रामदास स्वामींना ह्या पंक्ती का बरे लिहाव्याश्या वाटल्या असतील?

समाज प्रबोधनासाठी केलेल्या भ्रमंतीमधे समाज मनाचे आकलन त्यांना झाले असणार. मानवी स्वभावातील असंयम आणि असमाधान मनुष्याला सर्वार्थाने समृद्ध बनण्यास अडचणी निर्माण करतात. रामदास स्वामींनी मानवी प्रकृतीचे जे विश्लेषण केले असेल त्यातूनच 'मनाचे श्लोक' निर्माण झाले. उपरोलिखित प्रसिद्ध पंक्ती ह्या त्यातीलच आहेत.

ही पंक्ती मानवाच्या सर्व प्रकारच्या 'समृद्ध जीवना' बद्दल लिहिली गेली असावी. आयुष्य जगताना मिळणारे अनुभव, त्यातून येणारे कौशल्य, त्यातून मिळणारे ऐहिक सुख ह्यांचा संदर्भ 'समृद्ध जीवन' ह्या संकल्पनेशी आहे. ही संकल्पना अर्थातच व्यक्तिसापेक्ष असते. म्हणजेच व्यक्तिनुसार त्याचे संदर्भ बदलत जातात. 'जितक्या व्यक्ती तितक्या प्रवृति' असे आपण म्हणतोच. ह्याचाच अर्थ 'समृद्ध जीवना'ची संकल्पना व्यक्तिनुसार बदलत जाते.

स्वतःच्या प्रवृत्तिनुसार मनुष्य स्वतःला 'समृद्ध/असमृद्ध' ठरवित असतो. त्याच्या स्वभावातील संयम/समाधान ह्याची कमी/जास्त असलेली पातळी हे ठरवित असते. एखादी व्यक्ती स्वतःला 'सुखी माणूस' ह्या संकल्पनेमधे बसवू शकत नसेल तर? सर्व काही उपलब्ध असूनही त्याच्या असमाधानी वृत्तीमुळे तो कधीच समृद्ध जीवन जगू शकत नाही.

'तुम्हाला सुखी, समृद्ध तसेच समाधानी आयुष्य लाभो' अशा शुभेच्छा आपण एकमेकांना अनेकदा देतो. अनेक वर्षापासून देत आलो आहोत. पण खरंच अशा शुभेच्छा मिळाल्याने आपण जीवन समृद्धपणे जगतोय का? तसे जर नसेल तर का नाही? ह्याचा विवेकी बुद्धीने विचार होणे गरजेचे आहे.

वरील शुभेच्छा परत नीट वाचल्या तर एक गोष्ट लक्षात येईल. त्यात 'समाधानी आयुष्य लाभो' अशी शुभेच्छा पण अंतर्भूत आहे. म्हणजे काय? तर..

'समाधान' ही आपली मनोवस्था आहे. ते कोठेही बाजारात विकत मिळत नाही. पण आपणच आयुष्यभर 'असमाधानाची मशाल' मनात पेटती ठेवतो. त्यामुळे सहज फुलू शकणारी 'समाधानाची' फुलबाग मात्र जळून जाते. खरे तर, त्या समाधानातूनच आपण 'समृद्ध जीवना'कडे सहज वाटचाल करु शकणार असतो.

आकांक्षा, अपेक्षा, ओढ त्यातून निर्माण होणारे मायाजाल हे मानवी मनाचे खेळ. ह्या खेळातून निर्माण होणाऱ्या संवेदनातून ज्या कृती होतात त्या व्यक्तिसापेक्षच असतात. चराचराच्या भौतिकतेशी असलेला संबंध आणि आसक्ती ही त्या व्यक्तिच्या प्रवृत्ती आणि प्रकृतीचे विश्लेषण, विभाजन करते. त्यातूनच 'आत्म ...... अहं ....' चा जन्म होतो. कुठल्याही कृतीचे पर्याय, उपाय आणि उपचार त्या त्या व्यक्तिच्या सोशिकतेवर अवलंबून असतात. त्याचप्रमाणे 'समृद्धी' चे निकष देखील व्यक्तिसापेक्ष असतात. पण ह्यातून जर स्पर्धात्मक बरोबरी करण्याचा प्रयत्न झाला तर द्वेष, मत्सर, तिरस्कार ह्या भावनांची निर्मिती होणार, मनाच्या समाधानाची आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या जीवनाच्या समृद्धीची नाही.

'समृद्धी' म्हणजे नक्की काय? भोगवादाला चालना देणाऱ्या भौतिक साधनांची मुबलकता? तसेच जर असेल तर सर्व भौतिक सुखे मुबलकतेने उपलब्ध असूनही एकाकी जीवन जगणाऱ्या मनुष्याला समृद्ध म्हणायचे की सर्व प्रकारच्या कमतरता असूनही मीठ-भाकरच खायला मिळणारे पण सदैव एकमेकांच्या साथीला उभे राहणारे कुटुंब समृद्ध म्हणायचे?

माझ्या मते, जीवनातील खरी 'समृद्धी' ही 'संयम' 'सोशिकता' आणि त्यातून येणारे 'समाधान' ह्यातच सामावलेली आहे ह्याची जाण आणि जाणीव प्रत्येक मनुष्याला असणे गरजेचे आहे. अशी जाण परस्परांमधे निर्माण होणार असेल तर प्रत्येकाचेच जीवन समृद्ध होण्याची शाश्वती निश्चितच निर्माण होईल.

मानवाच्या उत्पत्तीबरोबरच इच्छा, आकांक्षा, अपेक्षा त्यातून येणारी लालसा, हाव, आसक्ती, आशा ह्या

भावनांचा जन्म झाला. ह्या भावनांच्या अनुषंगाने प्रदीप्त होणाऱ्या भीती, असुरक्षितता ह्या भावनांचा आणि विचारांचा जन्म देखील झाला.

आपण असंयमी होऊन तृषा शांती करण्यासाठी कोणत्या मृगजळामागे धावत असतो आयुष्यभर ते कोणीच सांगू शकत नाही. त्यासाठी अनेक शुक्लकाष्ठ मागे लावून घेतो.

परंतु संयम - मनाचा संयम - ह्यामुळे एकटे पडण्याची भीती अजिबात राहत नाही. संयम आपणास मानसिक बळ देतो. एकटेपणावर मात करण्यास, मोहजालापासून अनासक्त होण्यास, विकरांच्या भावनांना काबूत ठेवण्यास.

मानवी मनाच्या गरजा अनंत आहेत. आज पूर्ण झालेली गरज उद्या पुन्हा निर्माण होणार नाही ह्याची काय खात्री? त्यासाठी समाधानी वृत्तीची गरज आहे. गरजेच्या पूर्तीसाठी आपण कोणत्या मार्गाच्या अधीन होत आहोत हे उमजले पाहिजे. वाममार्गाने पूर्णत्वास नेलेली आपली मनोगते आपल्याला समाधान मिळवून देण्यास असमर्थ ठरतात. स्पर्धा, लोलूपता, अभिलाषा ह्या शब्दांच्या प्रेमात जोपर्यंत आपण गुंतलेलो आहोत तोपर्यंत 'समाधान' आभासमयच राहणार आणि 'समृद्ध जीवन' अप्राप्य.

असूरी महत्त्वाकांक्षा, त्यातून येणारा हव्यास, अभिलाषा, असंतुष्टता हे असमाधानी मनाचे अविष्कार आहेत. ते जोपर्यंत आपल्या आयुष्यात येत राहणार तोपर्यंत समाधानी आयुष्य, जे पर्यायाने जीवनाच्या समृद्धीच्या पायऱ्या चढू शकते ते कसे जमणार? जरी सुख आणि समृद्धी पायाशी लोळण घेत असली तरी मनाने आपण साशंकच राहणार कारण ती भावनाच असमाधानी मनाला स्पर्श करणार नाही, करु शकणार नाही.

आपण 'सुखी भव' असा आशीर्वाद देतो, पण आपली सुखाची कल्पना आणि आशीर्वाद ग्रहण करणाऱ्याची सुखाची कल्पना एक असेलच असे नाही. तो जर समाधानी वृत्तीचा नसेल तर किंवा समाधान 'न' मानणाराच असेल तर सुखी होईल का? आणि तो जर सुख मानणार नसेल तर त्याचे जीवन समृद्ध आहे असे म्हणता येईल का? संयमी माणूस सुखी होतोच कारण कोणत्याही परिस्थितीत आनंद शोधणे हा सोशिकतेचा स्थायीभाव असतो आणि असे आंतरिक समाधान समृद्ध जीवन जगण्यास साहाय्यभूत ठरते.

संयमाला ज्ञात असते कोठे थांबावे, कसा मार्ग काढावा, येऊ घातलेला प्रसंग कसा साजरा करावा, येऊ घातलेले संकट कसे टाळावे. संयमामुळे प्राप्त होणारे उपाय/पर्याय

आपणासमोर येतात पण आपण ते अंगीकारत नाही. असे का? आपल्यातील 'अहं' मुळे?

प्रत्येक व्यक्तीला समृद्ध जीवनाची सर्वसमावेशक अशी व्याख्या करता येऊ शकते. पण ते समृद्ध जीवन मात्र संयम, सामंजस्य, सहिष्णुता ह्यांच्या मिलापानेच साध्य करता येऊ शकते.

रूप, शिक्षण, विशिष्ट नैपुण्य, पैसे, स्थावर मालमत्ता ह्यातून मिळणारे यश, कीर्ती, समाजातील विशिष्ट स्थान हे समृद्धीचे निकष अगदीच व्यक्तिनिहाय आहेत. ह्या बरोबर जर अहंकारी मनाची जोपासना होणार असेल तर सर्व थोटके आणि व्यर्थच असेल. पण ह्या यशाबरोबर जर संयमी/सोशिक मनाची जोपासना होणार असेल तर त्या व्यक्तीचे जीवन 'समृद्ध' आहे असे म्हणणे योग्य ठरेल.

संयमाने विवेकाचे संवर्धन होते. भावनांचा भर आणि भार कमी होण्यास अवसर मिळतो. विचारांना भावनांवर नियंत्रण मिळण्यासाठी अवधी मिळतो. सारासार आकलनाची संधी मिळते. निर्णय आणि अंतिम कृती ह्याची परिस्थिती योग्य आणि अपेक्षित फलितामधे होण्याची निश्चिती वाढीस लागण्याची शक्यता अधिक असते. मनाच्या अंतरकलहावर हमखास उपाय म्हणून ह्या विचाराचे आकलन होणे/करुन घेणे गरजेचे आहे.

संयम भावना आणि विचारांना समृद्ध करतो. तोच संयम विकारांना विकलांग करतो. ह्याची प्रचिती माणूस वेळोवेळी अनुभवतोच. संयमाने क्षमाशीलता वृद्धींगत होते. याचनेचा अनादर होत नाही. अश्लाघ्य वाचेला खीळ बसते. तिरस्काराच्या हावभावांची कवचकुंडले सहजी गळून पडतात. मानवतेच्या औदार्यामधे माणुसकी खऱ्या अर्थाने डोकावते.

संयमाने अवधानाची बूज राखली जाते. समाधान वाढीस लागते. नात्यातील उदात्तता पातळी सोडत नाही. विध्वंसाची ज्वाला भडकत नाही. सामाजिक ऐक्य हाकेला प्रतिसाद देते. धर्म माणुसकी जपण्याचा प्रयत्न करतात. जे अनेक अंगांनी सामाजिक स्वास्थ्यासाठी एक रामबाण उपाय ठरु शकते. पर्यायाने जीवन समृद्ध होण्यास सहाय्यभूत ठरते.

सहिष्णूतेचा अवलंब हा मानसिक अवस्थांवर एक

गुणकारी परिणाम साधू शकतो. भावना आणि विचार ह्यांचे मानवी जीवनावर होणारे परिणाम - प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष - त्याच्या व्यक्तिमत्वातून प्रतीत होत राहतात. संयम ही एक भावनांवर नियंत्रण ठेवणारी अशी गुटी आहे जी विचारांना लगाम घालून शरीरावर होणाऱ्या बऱ्या वाईट परिणामांना काबूत ठेवते.

ज्या व्यक्ती मानवता आणि माणुसकी ह्या शब्दांच्या उत्पत्तीला आणि अभिप्रेत अर्थाला त्यांच्या वर्तनातून न्याय देतात त्या खऱ्या अर्थाने 'समृद्ध जीवन' प्राप्त करु शकतात, असे विधान केले तर अतिशयोक्त ठरणार नाही.

वैयक्तिक विकास साधताना जर प्रत्येकाने माणुसकी आणि मानवतेचा अविष्कार घडविण्याचा निश्चय केला तर सर्वसमावेशक बांधिलकीची जोपासना होईल. त्यातूनच सर्वांचे 'जीवन समृद्ध' होण्याची प्रक्रिया घडेल.

सौ. उमा इनामदार, मालाड (प)
फो. ९८२०४७७१०६१

## घोर-निराशा



पाहिली तिला मी पाठमोरी
वाटलं, असेल कुणी मदनाची मंजिरी
विचार केला मारावी जवळून फेरी
घेतली बाईक, मारली किक्
जवळून एक नजर टाकली
घोर निराशा पदरी आली .. कारण
ती होती काळी आणि तिरळी
बघून ती वाघ्याची मुरळी
तेथेच आली मला घेरी
फुकट गेली माझी फेरी

१८/१९

प्रभाकर गुपचूप, पुणे
फो. ९८८१५७९४९९




यंदा पावसाने कहर केला आहे, सर्व नद्या, नाले, तलाव, धरणे तुडुंब भरून वाहत आहेत. विदर्भ, मराठवाडा, खान्देश देखील यंदा भरपूर पावसामुळे सुखावला आहे. उन्हाळ्यात भासणारी पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवणार नाही, असे सरकारी प्रवक्ता वार्ताहरांशी बोलताना म्हणाला, ''यंदाच्या वर्षापुरता तरी महाराष्ट्र टँकर मुक्त होईल'' असा आशावाद सरकारने व्यक्त केला.

महाराष्ट्रातील सर्व टँकर्स मालकांनी एकत्र येऊन मंत्रालयावर एक भव्य टँकर मोर्चा काढण्याचा संकल्प केला आहे. यंदाच्या भरपूर पावसामुळे टँकर मालकांच्या पोटात गोळा उठला आहे. महाराष्ट्रातील सर्व टँकर्स यंदा रिकामे गॅरेज मध्ये पडून राहणार आहेत. त्यावर पोट असलेल्या चालक-मालक व इतर कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ येणार आहे. सरकारने दरमहा टँकर्स मालकांना प्रत्येकी रू. १५०००/- अनुदान द्यावे व बँकांचे थकित होणारे हप्ते व कर्जावरील व्याज माफ करावे, अशी मागणी टँकर्स मालक असोसिएशनने केली आहे.

मागण्या मान्य न झाल्यास सर्व टँकर्स रस्त्यात/महामार्गावर उभे-आडवे लावून रस्ते व महामार्ग बंद करण्यात येतील, असे आमचे मराठवाडा-औरंगाबाद येथील वार्ताहराने कळविले आहे.

वसंत धुपकर
फो. नं. : ८९७५२१८०४९

१८/१९

।। फार्म हाऊस प्लॉट ।। ।। फार्म हाऊस प्लॉट ।।

**पहिली फेज फुल्ल दुसरी फेज सुरु**



१०० प्लॉटचा भव्य प्रोजेक्ट

फक्त ३ लाखात ५ गुंठ्याचा प्लॉट

तालुका वेल्हा, (जि. पुणे) केळद घाट,

तोरणा आणि राजगड किल्ल्यांच्या जवळ

✦ निसर्गरम्य परिसर ✦

✦ पुण्यापासून एक तासाच्या अंतरावर ✦

✦ खरेदीखतानंतर त्वरीत ७/१२ ✦

✦ सुलभ हप्त्यांची सोय ✦

संपर्क - सुरेश घंगाळे , फोन नं. ७५०७८०६००७



# आशियाना

## Cottage Akshi Alibag

Only for senior citizens of all SBI pensioners

**GOLD PLAN - Rs.3500/-per person....**

This is ***MAP*** plan : including ***Veg / Non veg***
breakfast / tea/coffee, **lunch OR dinner.**
with **Ac** Room stay

Check in ***Monday 11 Am*** .Check out ***Thursday 11 Am***

**SILVER PLAN - Rs.2500/- per person....**

This is ***MAP*** plan : including Only ***veg***
breakfast, tea/coffee, **lunch OR dinner.**
with ***Non Ac*** Room stay

TRANSFER BOOKING AMOUNT IN SBI AC NO **30449388216**
AC. NAME RAJESH RANADE , IFC: **SBIN0013034**

**CALL : 750 7474 825**



IATA
ACCREDITED AGENT

**Universal Courier™**
We bring the universe at your doorstep

An Organization run by SBI pensioners
Mr. J.N. Sethia & Mr. P. W. Kamerkar's next generation

Universal Courier make sending your documents, parcels and express freight very easy.
Our service are designed to be uncomlipilicated, cost effective, high quality and secure.


**We deliver to**
**UK, USA, UAE, CANADA & AUSTRALIA**
**& 200 Worldwide destinations**



**TO SEND YOUR PARCELS CALL**
Mr. Biren Sethia -9820338233 | Mahesh Kamerkar -9820316152
Pushpendra Tiwari - 8425815253 Suresh Desai - 9323316152

No.01, Skylark, Nr. Kamgar Kalyan Bhavan, Azad Road, Andheri(E), Mumbai - 69.
Tel.: 022-2682 9090 / 26821072/74
Email :p.tiwari@ucglobal.com Website : www.ucglobal.com

*Unbeatable Price Unmatched Service*


INDIA, GO CARDLESS
WITH YONO CASH.
FOR THE FIRST TIME EVER,
AB CASH NIKALNA HUA
SAFE AND CARDLESS, DONO.
TO LOCATE A YONO CASH POINT,
LOOK FOR THE SIGN BELOW.
yono SBI
YONO CASH
WHY YONO CASH IS SAFE:
• Transact Via Dynamic Pin
• No Skimming
• No Card Trapping
• No Shoulder Surfing
• No Lost Card/Pin
yono SBI
Yono cash service is currently enabled only at select SBI ATMs | Download & Register now | sbiyono.sbi

**Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. SDM/PUNE/SR/14/17 Dated 24/01/2017**
**SSPO Pune under Postal Concession Register No. PCW/151/2017-2019**
**Licence to Post without Prepayment No.WPP - 22/2017-19 at P.S.O. PUNE G.P.O.411001**
**Published on 25-08-2019 and Posted on 25-08-2019**

# आनंद कशात आहे?

आनंद प्रेमात आहे, त्यागात आहे
भक्तीत आहे, समर्पणात आहे
सात्त्विक, निरागस बाळाच्या हास्यात आहे
पूर्ण उमललेल्या फुलाच्या गंधात आहे

मादक, कमनीय तरुणीच्या नजरेत आहे
कृतिहीन पण ऐश्वर्यसंपन्न जीवनात आहे
निरंकुश सत्तेत, अगणित संपत्तीत आहे
या साऱ्यांच्या मागील बाजूस दुखरी किनार आहे

देवाने समप्रमाणांत दिले दुःख आणि सुख
त्यातून उत्पन्न होणारी निराशा, आनंदही क्षणैक
माणूस नाहक कुरवाळतो, सांभाळतो दुःखाला
मग सुखही आक्रसते म्हणे मी इथे राहू कशाला?

सुखापाठी आनंदही येतो, राहतो जरी पळभर
मिळणारे समाधान स्रवते नसते निमिषभर
खरंतर सद्यस्थितीला माणूस
अंतर्बाह्य प्रतिसाद देतो, यावर अवलंबितो आनंद

२९/१९

अरुण तुळजापूरकर, पुणे
फो. ९८९०२२६१५४

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, सकाळी ११ ते दुपारी १२.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address** : A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 022-25446837 Timings : On Tuesday & Friday from 4 pm to 6 pm.

**Printed Matter**

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030.Ph:020-24332141**

To,

**Publisher** – Shri. Vilas Vasudeo Gandhe, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle), Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri Shailendra Borkar, Director, Sanwad Tradeprints Pvt. Ltd. B/7 Gowaikar Building, 595, Shaniwar Peth, Pune 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.